# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी -२०२३ चा निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक ०७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२३ रोजी घेण्यात आलेल्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल दिनांक १६ /०५/२०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे. सदर निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व) व मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक (उ.द.प.) मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित टंकलेखन/लघुलेखन संस्थांना यथावकाश वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश टंकलेखन/लघुलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणे व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रुपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक २६/०५/२०२३ पर्यंत भरण्यात यावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उतीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | राखीव विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थित अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टंकलेखन | 47619 | 44083 | 3391 | 40265 | 3818 | 145 | 91.34% |
| लघुलेखन | 15087 | 14001 | 1046 | 9216 | 4785 | 40 | 65.82% |
| एकूण | 62706 | 58084 | 4437 | 49481 | 8603 | 185 | 85.18% |

16/5/2023

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१